# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३९५-२२** **दिनांक २६/१२/२०२२**

## सायबर पोलीस ठाणे, विशाखापट्टणम शहर, पोलीस आयुक्तालय, राज्य आंध्र प्रदेश येथे दाखल असलेल्या ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्हयातील सराईत आरोपीतांना अटक करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात नवघर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

फिर्यादी सौ. सिरकी मानसा ह्या गुगल क्रोमवर ऑनलाईन साईटद्वारे नोकरी शोधत असतांना त्यांनी एका अनोळखी इसमास मोबाईलवर चॅटींग केली असता सदर अनोळखी इसमाने फिर्यादी यांना नोकरीचे अमिष दाखवुन त्यांना बनावट लिंकवर पैसे पाठविण्यास सांगितले. त्यानुसार फिर्यादी यांनी त्यांचे बँक खात्यामधुन एकुण १३,००,०००/- रुपये रक्कम ऑनलाईनरित्या पाठविली. परंतु, पैसे पाठवूनही नोकरी न मिळाल्याने फिर्यादी यांना त्यांची फसवणुक झाल्याचे समजताच त्यांनी दिनांक १३/१०/२०२२ रोजी सायबर पोलीस ठाणे, विशाखापट्टणम शहर, पोलीस आयुक्तालय, राज्य आंध्र प्रदेश येथे फिर्याद दिल्यावरुन अनोळखी इसमाविरुध्द गु.रजि.नं I ४९५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४६५, ४७१, ४१९, ४२०, १२० (ब) सह आय.टी.ॲक्ट ६६ (सी), (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासात फिर्यादी यांची फसवणुक झालेली रक्कम एस.बँक, विरार या बँक खात्यात वर्ग झाल्याचे निष्पन्न झाल्याने व नमुद बँक खात्यास लिंक असलेला मोबाईल नंबर हा नवघर पोलीस ठाणे हद्दीतील असल्याने विशाखापट्टणम शहर, पोलीस आयुक्तालय, राज्य-आंध्र प्रदेश यांचेकडील पोलीस निरीक्षक के.भवानी प्रसाद राव व पोलीस पथक नेमणुक सायबर पोलीस ठाणे, विशाखापट्टणम शहर यांनी नवघर पोलीस ठाणे येथे दिनांक २३/१२/२०२२ रोजी नमुद आरोपी यांचा शोध घेणेकामी पोलीस मदत मिळणेकामी विनंती केली होती.

त्याअनुषंगाने नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय माहिती प्राप्त करुन मिळालेल्या गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे १) सुमन शहा, रा. गल्ली नंबर ३३, नॅशनल डेअरीच्या जवळ, नवघर रोड, भाईंदर पुर्व, २) शुभम नरेंद्र सिंग, रा. गुलबर्गा, भिलवाडा, राजस्थान, सध्या रा. सी वुड, नेरुळ, नवी मुंबई, ३) दिपक सरगरा, ४) रणविर चौहाण, ५) मिठ्ठुला जाट ६) विकास बसिता सर्व रा. भिलवाडा, राज्य-राजस्थान सध्या रा. सी वुड, नवी मुंबई यांना ताब्यात घेतले. नमूद आरोपीतांकडे सखोल तपास करता त्यांनी सिम कार्ड पाहिजे आरोपी प्रदिप चौधरी पत्ता भिलवाडा, राजस्थान यास प्रत्येकी ५०,०००/- रुपये ते २,००,०००/- रुपयांपर्यंत वेगवेगळ्या बँकेमध्ये बनावट कागदपत्र व विविध कंपन्यांचे बनावट स्टँपचे आधारे चालु खाते उघडुन ऑनलाईन फसवणुक करण्याकरीता विकत असल्याचे तपासात सांगितले.नमूद आरोपीतांना दिनांक २५/१२/२०२२ रोजी त्यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने अटक करण्यात आली आहे.

नमूद आरोपीतांच्या ऑफीसमधुन ते ऑनलाईन फसवणुक करण्याकरीता वापरत असलेले नोकीया, मायक्रोमॅक्स, सॅमसंग, ओप्पो, आय-टेल इ.कंपनीचे ३० मोबाईल फोन, जिओ फायबर, जिओ बॅक्स कंपनीचे ०५ इंटरनेट राउटर, ६९ वेगवेगळ्या कंपनीचे सिमकार्ड, विविध कंपन्याचे नावे असलेले एकुण ५६ रबरी स्टॅम्प तसेच

२६ वेगवेगळ्या बँकाचे ए.टी.एम. कार्ड असा एकुण अंदाजे ५,००,०००/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. अटक आरोपी हे ऑनलाईन फसवणुक करण्यात सराईत असुन त्यांनी अनेक लोकांची फसवणुक केली असल्याबाबत निष्पन्न झाले आहे. गुन्हयाचा अधिक तपास विशाखापट्टनम शहर, पोलीस आयुक्तालय, राज्य-आंध्र प्रदेश हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, प्रकाश मासाळ, पोलीस निरीक्षक ( गुन्हे ) सपोनि. योगेश काळे, पोउनि. अभिजित लांडे, पोह भुषण पाटील, गणेश जावळे, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, पोशि. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, विनोद जाधव तसेच पोलीस मित्र करण शाह तसेच विशाखापट्टनम शहर, पोलीस आयुक्तालय, राज्य-आंध्र प्रदेश यांचेकडील पोलीस निरीक्षक के.भवानी प्रसाद राव, सफौ. श्रीनिवास राव, पोशि. पी.क्रिष्णा, एस.के.एम.बाशा, बि.व्ही.सतीश कुमार यांनी केलेली आहे.

--------------ooooo--------------